तरूणभारत संवाद

सोलापूर, गुरुवार, दि.१२ एप्रिल २०१८

# आज देशात रेल्वे इंजिनिअरिंग पदवीधारांना मोठी मागणी

## माईर्स एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्चतर्फे आयोजित चर्चेत : मान्यवरांचे प्रतिपादन

वार्ताहर
बार्शी

सार्वजनिक वाहतूक क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या भारतीय रेल्वेला अधिक सक्षम व समाजपयोगी करण्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. ती पूर्ण करण्यासाठी एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग महाविद्यालय मोठी भूमिका बजावेल. असे प्रतिपादन माईर्स एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, बार्शी येथे आयोजित चर्चासत्रात मान्यवरांनी केले.

या चर्चासत्रात भारतीय रेल्वेचे सल्लागार व भारतीय रेल्वेच्या सिव्हिल इंजिनिअरिंग बोर्डाचे माजी सल्लागार जे.एस. मुंड्री, बंगलुरू येथील पीच इंजिनिअरिंग प्रा.लि.चे अध्यक्ष श्रीनिवास उडीपी, हैद्राबाद मेट्रोचे सल्लागार एम.आर.रामकृष्णन, बंगलुरू येथील इन्फोसिसचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. एम.एस.एस.प्रभू, पुणे येथील रेल्वेचे माजी अधिकारी व सल्लागार नीरज जैन, बंगलुरू येथील पीच इंजिनिअरिंग प्रा.लि.च्या संचालिका तिलोत्तमा श्रीनिवास, इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंगचे अधिष्ठाता एस.के.बन्सल,



बार्शी : चर्चासत्राच्या प्रसंगी डावीकडून प्रा. स्वाती कराड-चाटे, प्रा. प्रकाश जोशी, श्रीनिवास उडीपी, प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड, माईर्स एमआयटीच्या कार्यकारी संचालिका प्रा.स्वाती कराड-चाटे, माईर्स एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्चचे मेंटॉर डॉ. सुभाष आवळे व प्राचार्य डॉ. अतुल आयरे सहभागी झाले होते.

**सध्या देशात नऊ ठिकाणी मेट्रोची काम सुरू : रामकृष्णन**

यावेळी जे.एस. मुंड्री म्हणाले, भारतीय रेल्वे ही समाजाला उपयोगी असलेली सार्वजनिक वाहतूक सेवा आहे. तिला मजबूत करण्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. एरोनॉटिकल व नेव्हलचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उपलब्ध आहेत. परंतु, रेल्वेसाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी हवे असलेले प्रशिक्षण देणाऱ्या संस्था संपूर्ण देशभरात अगदी बोटावर मोजण्या इतक्या आहेत.

प्रा.स्वाती कराड-चाटे म्हणाल्या, आज जगात रेल्वेची प्रगती झपाट्याने होत आहे. त्यामध्ये मेट्रो, मोनो रेल, बुलेट ट्रेन यासारख्या वेगवान रेल्वेंचा समावेश आहे. आज या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी आहे. ती गरज या महाविद्यालयाच्या माध्यमातून पूर्ण होईल. त्याच प्रमाणे मेक इन इंडिया आणि मेड इन इंडियाचा नारा देणारे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्णत्वास नेणास आमची भूमिका महत्वाची असेल.

एम.आर.रामकृष्णन म्हणाले, भारतातील प्रत्येक मेट्रो शहरात सार्वजनिक वाहतुकीसाठी मेट्रोची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. त्यप्रमाणे सध्या देशात ९ ठिकाणी मेट्रोचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यासाठी योग्य व प्रशिक्षित इंजिनिअर व अन्य विभागातील कर्मचार्यांची आम्हाला गरज भासते. ही गरज रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेजच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकेल.

नीरज जैन म्हणाले, पुढील काळात देशामध्ये अनेक रेल्वे निर्मितीचे कारखाने निर्माण होणार आहेत. यासाठी मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल यासारख्या अन्य विभागातील इंजिनिअरांची आवश्यकता भासेल. डॉ. सुभाष आवळे यांनी मान्यवरांचे आभार मानले.